**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७**

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ४

सभावृत्तांत

दिनांक ०३/०७/२०१५ दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुलै महिन्याची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०३/०७/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री. अरुण मदन टाक | सभापती |
| २. | मा.श्री. प्रभाकर नामदेव वाघेरे | सदस्य |
| ३. | मा. श्रीमती विमल रमेश काळे | सदस्या |
| ४. | मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्या |
| ५. | मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्या |
| ६. | मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ७. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | सदस्य |
| ८. | मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ९. | मा. श्री. बोकड रामदास गेणभाऊ | सदस्य |
| १०. | मा. श्रीमती वैशाली राहुल जवळकर | सदस्य |
| ११. | मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

----------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. नितीन देशमुख, उपअभियंता विद्युत, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. रत्नपारखी, मा. दिलीप सोनवणे, मा. विनय ओहोळ, मा. एल.बी. जाधव, उपअभियंता स्थापत्य, मा. रवींद्र पवार, उप अभियंता,जलनि:सारण, मा. अनघा पाठक,उपअभियंता, झो.नि,पू., मा. अजय जाधव, मा.एस.एस. गायकवाड,मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. इदे अनिल, कनिष्ठ अभियंता, मा. रोकडे जयवंत, मा.बी.एम. मुलाणी, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा.व्ही.ए. पाडवी, मा. गणेश राऊत, कनिष्ठ अभियंता, विद्युत, मा. मुठाळ सी.एल., मा. आर.बी. जगताप,कनिष्ठ अभियंता,नगररचना,मा. डी. के. बैचे, हॉर्टी. सुपरवायझर, मा.सोनवणे ए.सी., आरोग्य निरीक्षक मा.एम.एस.कदम,अतिक्रमण निरीक्षक, मा. अमर मद्रासी मलेरिया इन्सपेक्टर, मा. आर.बी. गायकवाड, पशू वैद्यकीय विभाग इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ३ दिनांक १९/०६/२०१५ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील कार्यपत्रिका क्र. ३ माहे जुन २०१५ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- ड प्रभाग समिती कार्यपत्रिका क्र. ४ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र.१०  विषय क्र. १

दिनांक : ३/७/२०१५  विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा. उषा संजोग वाघेरे (पाटील)  सूचक : मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

सदंर्भ : मा. उषा संजोग वाघेरे (पाटील) यांचा दिनांक १९/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे गावठाण येथील पिंपरी वाघेरे गाव स्मशानभूमीजवळ मनपाचे शौचालय बांधलेले असुन त्यामुळे सदर परिसराजवळील नागरीकांच्या तक्रारी वाढत आहेत. दुर्गंधी पसरल्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने हे योग्य नसल्याने सदर परिसरातील नागरीकांच्या शौचालय पाडणेबाबत वारंवार तक्रारी येत असल्याने सदर शौचालय पाडणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

-----------------------------

ठराव क्र. ११  विषय : २

दिनांक : ३/७/२०१५  विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा. उषा संजोग वाघेरे (पाटील)  अनुमोदक : मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा. उषा संजोग वाघेरे (पाटील) यांचा दिनांक १९/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे गावठाण मधील १०० फुटी रस्ता पिंपळे सौदागर पुलाजवळ मनपा मार्फत ज्येष्ठ नागरीक व महिला बचत गटासाठी विरंगुळा केंद्र बांधण्यात आलेले असुन सदर ठिकाणचा वापर होत नसल्याने तेथे मद्यपी तसेच देवीदेवतांचे फोटो लावणेत आलेले आहेत त्यामुळे जातीय कलह निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे सदर ठिकाणी सुशोभीकरणांतर्गत ज्येष्ठ नागरीकांसाठी बेंचेस, तसेच लॉन वगैरे लावुन सुशोभिकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

-----------------

ठराव क्र.१२  विषय क्र. ३

दिनांक : ३/७/२०१५  विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. विलास नांदगुडे  अनुमोदक : मा. रामदास बोकड

संदर्भ : मा. विलास नांदगुडे यांचा दिनांक १९/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव

पिंपळे निलख प्रभाग क्र. ५४ येथील कै. प्रभाकर नारायण साठे उद्यानामध्ये कै.प्रभाकर नारायण साठे मा. महापौर पिंपरी चिंचवड म.न.पा. यांचा अर्धाकृती पुतळा उभारणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

-----------------

सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

सन्मा. सदस्य यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १ :** ड क्षेत्रिय कार्यालय प्रशासन विभागाकडील प्रवास खर्च या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणे

**विषय क्र.** २ : प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव मध्ये हॉकर्स झोन करणे या कामांतर्गत पिंपळे गुरव येथे स्थापत्य विषयक किरकोळ कामे करणे व पावसाळी पाण्याचा निचरा होणेसाठी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणेचे काम करणेबाबत

**विषय क्र.** ३ प्रभाग क्र. ४७ काळेवाडी ज्योतिबानगर येथील ज्योतिबा विठ्ठल रुखमाई व (ज्ञानेश्वर) माऊली मंदिर येथील कमानीस “ज्योतिबा विठ्ठल रुखमाई व (ज्ञानेश्वर) माऊली मंदिर कमान” असे नामकरण करणे

सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक ०३/०७ /२०१५ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. १३ विषय क्र. ४

दिनांक : ०३/०७/२०१५ विभाग : प्रशासन विभाग

संदर्भ : ड क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव क्र. डक्षे/१/कावि/५७७/२०१५ दि. ३/७/२०१५

ड क्षेत्रिय कार्यालयाकडील “प्रवास खर्च” या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ या आर्थिक वर्षा करीता र.रु. ५०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. ड क्षेत्रिय अधिकारी श्री. चंद्रकांत खोसे यांची पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये प्रतिनियुक्तीने नेमणुक झालेली असुन शासन निर्णयानुसार त्यांना संयुक्त बदली अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानसार त्यांना बदली अनुदान र.रु. १८९०५/- अदा करणेकामी “प्रवास खर्च” या लेखाशिर्षावरील तरतुद र.रु. ५०००/- अपुरी पडत असलेने ड क्षेत्रिय प्रशासन विभागाकडील कार्यालयीन आकस्मिक खर्च परिशिष्ट ब मधील “इतर खर्च” या लेखाशिर्षातुन र.रु. २०,०००/- इतकी तरतुद “प्रवास खर्च” या लेखाशिर्षावर वर्ग करणेचे प्रस्तावास मंजुरी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

-----------------

ठराव क्र.१४ विषय क्र. ५

दिनांक : ०३/०७/२०१५ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा. राजेंद्र गणपतराव जगताप अनुमोदक : मा. शत्रुघ्न उर्फ बापू सिताराम काटे

संदर्भ : मा. राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दिनांक ०३/०७/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील काही भागात पावसाळी पाण्याचा निचरा होणेकरीता पाईप लाईन नसल्याने पावसाळयात रस्त्यावर पाणी साचत आहे. तेथील स्थानिक रहिवासी यांना त्रास सहन करावा लागत आहे. व सदर ठिकाणी पाणी जमा होऊन रोगराई सदृश परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव मध्ये हॉकर्स झोन करणे या कामातुन पिंपळे गुरव येथे स्थापत्य विषयक किरकोळ कामे करणे व पावसाळी पाण्याचा निचरा होणेसाठी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणेचे काम करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

-----------------

ठराव क्र.१५ विषय क्र. ६

दिनांक : ०३/०७/२०१५ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक : मा. निता विलास पाडाळे अनुमोदक : मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ : मा. निता विलास पाडाळे यांचेकडील दिनांक ०३/०७/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४७ काळेवाडी ज्योतिबानगर येथील ज्योतिबा विठ्ठल रुखमाई व (ज्ञानेश्वर) माऊली मंदिर येथे कमान करणेस या पूर्वी ठराव मंजुर झाला असुन सदर कमानीस “ज्योतिबा विठ्ठल रुखमाई व (ज्ञानेश्वर) माऊली मंदिर कमान” असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

---------------------

यानंतर मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे सदस्यांनी त्यांचे मत व्यक्त केले.

**मा. निता विलास पाडाळे** : कचरा गाडयांचे नियोजन बिघडलेले असुन औषध फवारणीचे काम नीट होत नाही. फॉगिंगचे काम समाधानकारक नाही. तसेच एम.एम. शाळा, काळेवाडी, ज्योतिबानगर येथील स्वच्छतेच्या कामात अडचणी आहेत.

**सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे** : गाडयांचे नियोजन व्यवस्थित करण्यात आले आहे.

**मा. निता विलास पाडाळे** : डॉ. जगदाळे यांचे पार्कींगमधील कचरा काढलेला आहे. परंतु तेथे दुर्गंधी आहे

**सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे** : या संदर्भात संबंधितांना नोटीस काढली आहे. तसेच सदर बाबत बांधकाम परवानगी विभागास कळविले आहे.

**मा. आरती चोंधे** : कचरा गाडया वेळेत येत नाहीत. नागरीकांच्या तक्रारी येत असतात.

मा. अनिता मच्छिंद्र तापकीर :- तापकीरनगर येथे पाणी साचते. व्होडाफोनचे टेलिफोन केबलचे कामामुळे रस्ता खराब होतो तसेच ड्रेनेज विषयक अडचणी आहेत.

**मा. रामदास बोकड** : स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्या बदल्या झाल्या असुन कोणीही कनिष्ठ अभियंता , आरोग्य मुकादम उपलब्ध नाहीत.

**मा. शत्रुघ्न उर्फ बापू सिताराम काटे** : रामनगर येथील पाणी पुरवठयाच्या प्रश्नावर काहीही कार्यवाही झालेली नाही.

**मा. शत्रुघ्न उर्फ बापू सिताराम काटे, मा. राजेंद्र जगताप, मा. आरती चोंधे, मा. रामदास बोकड, मा. थोपटे सो.** :-स्थापत्य , पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी प्रभाग समिती बैठकीस उपस्थित राहत नसलेबाबत निषेध व्यक्त करतो. तसेच सुट्टीचे दिवशी अधिका-यांना दुरध्वनी केल्यास फोन घेतला जात नाही ही बाब योग्य नाही. जर अधिकारी सभेस उपस्थित राहत नसतील अशा प्रभाग समिती बैठकीचे नियोजन करणेत येऊ नये.

**मा. अध्यक्ष** : प्रभाग अधिकारी यांनी उत्तर द्यावे.

**मा. क्षेत्रिय अधिकारी श्री. चंद्रकांत खोसे** : कार्यकारी अभियंता स्थापत्य श्री. ओंभासे हे मुलाचे आजारपणामुळे रजेवर असुन त्यांनी कल्पना दिली आहे. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांच्याशी संपर्क साधला असता ते पाणीपुरवठा लाईनसाठी मावळ येथे गेले आहेत असे कळविण्यात आले आहे. त्यांनी श्री. जावळे यांना उपस्थित राहण्यास सांगितले व संबंधित श्री.जावळे उपअभियंता रजेवर आहेत. पशू वैद्यकीय अधिकारी हे माहिती अधिकारांतर्गत अपिलाचे सुनावणीकामी पुणे येथे गेले असल्याने ते बैठकीस उपस्थित राहू शकत नाहीत. त्यांनी प्रतिनिधी पाठवला आहे. सद्यस्थितीत बांधकाम परवानगी विभागामध्ये अनधिकृत बांधकामे निर्मुलनाचा समावेश केला असुन मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी नवीन कनिष्ठ अभियंता यांच्या नियुक्तीचे कामकाज प्रशासन विभागाकडून सुरु आहे. त्यामुळे स्थापत्य विभागात अधिकारी कमी आहेत. तसेच कार्यकारी अभियंता स्थापत्य, विद्युत व पाणीपुरवठा हे मा. शहर अभियंता व सह शहर अभियंता यांचे नियंत्रणाखाली काम करीत आहेत त्यामुळे त्यांचे कामकाजावर क्षेत्रिय अधिकारी यांचे प्रत्यक्ष नियंत्रण नाही. तसेच सर्व अधिकारी यांना सभेची वारंवार कल्पना दिली आहे. त्यांनी सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे व अनुपस्थितीबाबत सभापती, प्रभाग समिती यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक आहे.

**मा. अध्यक्ष** : सर्व अधिकारी उपस्थित असतील तरच पुढील प्रभाग समितीचे आयोजन करावे.

**मा. राजेंद्र जगताप** :- प्रभाग क्र. ५७ येथील १८ मीटर रस्त्यामधील पत्र्याची शेड काढणेबाबत अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर रस्त्याबाबत सन १८/११/२०११ रोजी निर्णय झालेला असुनही स्थापत्य विभागाकडून कारवाई करण्यात आलेली नाही. पत्र्याच्या शेडवर जर वेळेत कारवाई करण्यात आली नाही तर ते नागरीक महापालिकेचे अनधिकृत नळकनेक्शन घेतात त्यामुळे अनधिकृत पत्राशेड वेळेत काढणे आवश्यक आहे.

तसेच साई आंगण इमारतीतील रहिवाशी स्वत:हुन बांधकाम काढून घेणेस तयार आहेत परंतु महापालिकेच्या विभागाकडून कारवाई करण्यात येत नाही.

**मा. रामदास बोकड** : प्रभाग क्र. ५६ व ५७ मधील कामांचे आदेश मे. मथरानी यांना दिलेले आहेत. मथरानी यांचे कामाला तरतुद उपलब्ध नाही. तरतुद वर्गीकरणाचा प्रस्ताव सादर केला आहे. तसेच वॉर्ड क्र. ५६ येथील तीन कामांचे आदेश देणेत आलेले आहेत परंतु अद्याप सदर काम सुरु करणेत आलेले नाही.

**मा.श्री. सोनवणे उपअभियंता, स्थापत्य** : संबंधित ठेकेदार काम करत नसल्याने त्यांना ब्लॅकलिस्ट करण्याचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**मा. राजेंद्र जगताप** :- क्षेत्रिय अधिकारी यांनी सर्व प्रभागांमध्ये संबंधित अधिका-यांसमवेत साईट व्हिजिट करुन कामकाजाबाबत आढावा घ्यावा. नगररचना विभागाने प्रभाग क्र. ५६ व ५७ मधील सर्व चौकांचे डीमार्केशन करुन घ्यावे.

**मा. रामदास बोकड** : प्रभाग क्र. ५६ मधील उद्यानाचे आरक्षणाची जागा ताब्यात घेणेची कार्यवाही प्रलंबित आहे. तेथील रहिवाशी जागा ताब्यात देणेस तयार आहेत परंतु नगररचना विभागाचे अधिकारी सदर कार्यवाही करीत नाहीत.

**मा. प्रभाकर वाघेरे** :- पिंपरी वाघेरे येथील आरक्षणाची ९० टक्के जागा महापालिकेच्या ताब्यात आहे परंतु १० टक्के जागा महापालिकेच्या संबंधित विभागाने उर्वरीत जागा ताब्यात घेणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

अतिक्रमण विभागाचे कामकाजास अनुसरुन खालील प्रमाणे सन्मा. सदस्यांनी मत व्यक्त केले.

**मा. कैलासभाऊ थोपटे, मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे, मा. राजेंद्र जगताप** : अतिक्रमण कारवाई करण्याच्या वेळेत बदल करण्यात यावा. कारण अतिक्रमण करणारे हातगाडीधारक, वा विक्रेते हे संध्याकाळी ६ नंतर रस्त्यावर गाडया उभ्या करतात व वाहतुकीस अडथळा निर्माण करतात.

**सचिव तथा प्रशासन अधिकारी अतिक्रमण** : संध्याकाळी कार्यालयीन वेळेनंतर पोलीस बंदोबस्त उपलब्ध होत नसलेने अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करताना मर्यादा येतात. पोलीस उपलब्ध करुन देण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येत असुन पोलीस उपलब्ध होताच अतिक्रमण विभागाच्या कामकाजाची वेळ बदलण्यात येईल .

**मा.सभापती** : पुढील प्रभाग समिती बैठकीस सर्व संबंधित अधिकारी उपस्थित राहतील याची खातरजमा करण्यात येऊन बैठकीचे आयोजन करावे व सर्व अधिकारी यांनी अनुपस्थितीबाबत पूर्वकल्पना द्यावी. संबंधित अधिकारी प्रभाग समिती सभेकडे दुर्लक्ष करीत असलेस त्यांचेवर कार्यवाहीसाठी संबंधित विभागाकडे प्रस्ताव पाठवावेत अशा सूचना देऊन माहे जुलै २०१५ ची मासिक सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-
(अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/६३/२०१५
दिनांक – १६/०७/२०१५

**सही/-**
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती